ePaper

# मलिकांवरून मतभेद निर्माण होण्याचे चिन्हं

॥ वर्ष - 8 । अंक -102 ॥ UDYAM-MH-26-0158827॥



महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## आतील पानांत

- रोहित शर्मा पंचांवर भडकला
- चौकार मारून पूर्ण केले शतक
- बिश्नोईकडे शेकडो एकर जमीन
- मुख्यमंत्री पुन्हा गुवाहाटीला जाणार

www.mahaenews.com ॥ रविवार, दिनांक 20 ऑक्टोबर 2024 ॥ पुणे आवृत्ती ॥ mahaenews.com ॥ maha_enews ॥ Mahaenews

## भाजप किमान 155 ते 165, एकनाथ शिंदे यांची शिवसेना किमान 70 ते 75 जागा लढवणार

# महायुतीचे गणित सुटले!

## अमित शहांसोबत झालेल्या बैठकीत जागावाटपाच्या सूत्रावर शिक्कामोर्तब

। मुंबई । महाईन्यूज

**महाराष्ट्रातील महायुतीच्या जागावाटपावर दिल्लीतील बैठकीत जवळपास शिक्कामोर्तब झाले असून, हाताच्या बोटांवर मोजता येतील इतक्या जागांबाबत मुंबईत एक बैठक घेऊन येत्या दोन दिवसांत तोडगा काढला जाणार आहे. शुक्रवारी रात्री उशिरा गृहमंत्री अमित शहा यांच्या निवासस्थानी झालेल्या बैठकीत जागावाटपाचे सूत्र निश्चित झाले. त्यानुसार, भाजप किमान १५५ ते १६५, एकनाथ शिंदे यांची शिवसेना किमान ७० ते ७५ आणि अजित पवार यांची राष्ट्रवादी काँग्रेस किमान ४० ते ४५ जागा लढवणार असल्याचे समजते.**



दिल्लीतील कृष्ण मेनन मार्गावरील अमित शहा यांच्या निवासस्थानी शुक्रवारी रात्री उशिरा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांची बैठक झाली. सुमारे दोन तास चाललेल्या या बैठकीत महायुतीतील छोट्या पक्षांनाही काही जागा देण्याचे मान्य करण्यात आले. 'लोकसभेनंतर आम्ही राज्यात जागानिहाय सर्वेक्षण केले आहे व त्यानुसारच कोणाला किती व कोणत्या जागा द्यायच्या याचे सूत्र ठरवले आहे. पाच-सात जागांवर बदल होऊ शकतात,' असे शहा यांनी स्पष्ट केल्याचे समजते. ज्यांचे जास्त आमदार त्यांना जास्त जागा हे ढोबळ सूत्र कायम राvहील. घटक पक्षांनी कोणाला तिकिटे द्यायची हा त्यांचा अधिकार आहे, पण काही आमदारांबाबत आम्ही आमचा अभिप्राय देऊ, त्याचाही विचार करा; तसेच जागावाटपाबाबत प्रत्यक्ष घोषणा होईपर्यंत प्रसारमाध्यमांना फारशी माहिती देण्याचे टाळा, अशी सूचना या बैठकीत मान्य करण्यात आल्याचे कळते. राज्यात महायुतीची पुन्हा सत्ता येण्यासाठी काही तडजोडी सर्वांनाच कराव्या लागतील हे पंतप्रधानांचे मत तुमच्या कानावर घालतो आहे, असेही शहा यांनी सांगितल्याचे सूत्रांनी सांगितले.

### मुंबईतील जागावाटप निश्चित

राज्यात महायुतीमधील घटक पक्ष किती जागा लढविणार हे दोन दिवसांत निश्चित होणार असले, तरी मुंबईतील जागावाटप मात्र निश्चित झाले आहे. मुंबईतील ३६ जागांपैकी भाजप १८ जागा लढविणार आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची शिवसेना १६ जागा आणि अजित पवार यांची राष्ट्रवादी काँग्रेस वांद्रे पूर्व आणि अणुशक्तिनगर या दोन जागा लढविणार असल्याचे निश्चित झाल्याचे खात्रीलायकरित्या समजते. अणुशक्तिनगर येथे नवाब मलिक हे 'राष्ट्रवादी'चे विद्यमान आमदार आहेत, तर वांद्रे पूर्वमधील काँग्रेसचे आमदार झिशान सिद्दिकी हे 'राष्ट्रवादी'तून आगामी निवडणूक लढविणार आहेत. विशेष म्हणजे उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेने मुंबईत ज्या जागा लढवल्या होत्या, त्यातील जवळपास सर्वच्या सर्व जागा शिंदे यांची शिवसेना लढविणार आहे.

## 'बोपदेव घाट' प्रकरणातील पीडित तरुणीला 5 लाखांची नुकसान भरपाई

### विधी सेवा प्राधिकरणाकडून 'मनोधैर्य योजने'अंतर्गत मदत

। पुणे ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

बोपदेव घाट सामूहिक बलात्कार प्रकरणातील पीडित तरुणीला विधी सेवा प्राधिकरणाकडून 'मनोधैर्य' योजने अंतर्गत पाच लाख रुपयांची नुकसान भरपाई देण्यात येणार आहे. विधी सेवा प्राधिकरणाकडून याबाबतचा अर्ज मंजूर करण्यात आला आहे.



विधी सेवा प्राधिकरणाच्या 'मनोधैर्य' योजनेअंतर्गत अत्याचार प्रकरणातील पीडितांना मदत करण्यात येते. बोपदेव घाटात ३ ऑक्टोबर रोजी मित्रासोबत फिरायला गेलेल्या तरुणीला कोयत्याचा धाक दाखवून तिच्यावर सामूहिक बलात्कार करण्यात आला होता. याप्रकरणी दोन आरोपींना अटक करण्यात आली असून, त्यांच्याबरोबर असलेल्या साथीदाराचा शोध घेण्यात येत आहे. 'मनोधैर्य' योजने अंतर्गत नुकसान भरपाई मिळवण्यासाठी पीडित तरुणीने विधी सेवा प्राधिकरणाकडे अर्ज केला होता. अर्ज आल्यानंतर नऊ दिवसांत संबंधित अर्ज मंजूर करून पीडित तरुणीला दिलासा देण्यात आला.

नुकसान भरपाईपोटी मिळणारी २५ टक्के रक्कम तरुणीला रोख स्वरूपात देण्यात येणार आहे.

### मनोधैर्य योजना म्हणजे काय?

पीडित बालक किंवा महिलेचे पुनर्वसन करण्यासाठी 'मनोधैर्य' योजना सुरू करण्यात आली आहे. विधी सेवा प्राधिकरणाच्या माध्यमातून या योजनेची अंमलबजावणी होत असते. पीडित महिलेला कमीत कमी ३० हजार रुपयांपासून जास्तीत जास्त दहा लाख रुपयांची नुकसान भरपाई मिळते. पीडित महिलांना आधार आणि धैर्य देण्यासाठी ही योजना सुरू करण्यात आली आहे. प्रमुख जिल्हा न्यायाधीश महेंद्र महाजन यांच्या मार्गदर्शनानुसार त्वरित अर्ज निकाली काढण्यात आला. पीडित तरुणीने ११ ऑक्टोबर रोजी नुकसान भरपाई मिळवण्यासाठी अर्ज केला होता. तो १९ ऑक्टोबर रोजी निकाली काढण्यात आला, असे पुणे जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या सचिव सोनल पाटील यांनी नमूद केले.

# तुला कोणी लंकेंनी पाठवलं का?

## घोषणा देणाऱ्या कार्यकर्त्यावर अजित पवार संतापले

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**विधानसभेची निवडणूक जाहीर झाल्यामुळे महाराष्ट्राच्या राजकारणात सध्या घडामोडींना वेग आला आहे. एकीकडे महाविकास आघाडीच्या बैठका तर दुसरीकडे महायुतीमधील पक्षाच्या नेत्यांमध्ये बैठकांचा धडाका सुरु आहे.**



तसेच अनेक नेत्यांचे विविध मतदारसंघात दौरे देखील सुरु आहेत. आता लवकरच जागावाटपही जाहीर होणार असल्याचं सांगितलं जात आहे. यामध्ये महायुतीमध्ये कोणत्या पक्षाला किती जागा मिळतात? हे पुढच्या दोन दिवसांत स्पष्ट होईल. दरम्यान, निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर उपमुख्यमंत्री अजित पवारांनी राष्ट्रवादीच्या कार्यकर्ता मेळाव्याचा धडाका लावला आहे. १९ ऑक्टोबर रोजी पारनेरमध्ये अजित पवारांचा कार्यकर्ता मेळावा पार पडला. या कार्यक्रमात बोलताना अजित पवारांनी खासदार निलेश लंके यांच्यावर नाव न घेता हल्लाबोल केला. मात्र, याच सभेत अजित पवार बोलत असताना एका कार्यकर्त्याने खालून जोरदार घोषणाबाजी केली. त्यामुळे अजित पवारांनी कार्यकर्त्याला चांगलंच सुनावलं. “तुला कोणी लंकेंनी पाठवलं का?”, असं म्हणत अजित पवारांनी त्या कार्यकर्त्याला सुनावलं. उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा आज पारनेर विधानसभा मतदारसंघात कार्यकर्ता मेळावा पार पडला. या मेळाव्यात बोलताना अजित पवारांनी खासदार निलेश लंके यांच्यावर नाव न घेता जोरदार टीका केली. मात्र, अजित पवार कार्यकर्त्यांना संबोधित करत असतानाच एका कार्यकर्त्याने खालून जोरदार घोषणाबाजी सुरु केली. यानंतर अजित पवार संतापले आणि म्हणाले, “थांब ना, मी तेच सांगतोय. तुझ्या जे मनात आहे ना तेच माझ्या बोलण्यातून बाहेर पडणार आहे. थांब जरा, असं अजित पवार म्हणाले. मात्र, कार्यकर्ता तरीही घोषणाबाजी राहिला. त्यानंतर पुन्हा अजित पवार म्हणाले, “मी पण शेतकरी आहे. मलाही फार कळतं.

### पुन्हा निवडणूक लढविण्याचा निर्धार

माणसं एखाद्या पदावर गेले की बदलतात. तसंच निलेश लंकेंचं झालं, ते बदलले. आता खासदारकी त्यांच्याकडे (निलेश लंके), आमदारकी सुद्धा ते त्यांच्याच घरात घ्यायला निघाले आहेत. त्यामुळे जर दोन्हीही (खासदारकी आणि आमदारकी) एकाच घरामध्ये गेले तर तुम्हाला (जनतेला) कोणीही वाली राहणार नाही”, असं म्हणत अजित पवारांनी निलेश लंकेंवर हल्लाबोल केला.तुला कोणी लंकेंनी पाठवलं का? ज्या गावच्या बोरी असतात त्याच गावच्या बाभळी असतात. कशाला मला बोलायला लावता?”, असं म्हणत अजित पवारांनी कार्यकर्त्यांना खडसावलं.यावेळी अजित पवारांनी निलेश लंके यांच्यावर टीका केली. अजित पवार म्हणाले.

# अजित पवारांना ऐन निवडणुकीत आणखी एक धक्का

## आमदार डॉ.राजेंद्र शिंगणे यांनी (शरद पवार) पक्षात प्रवेश केला

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**विधानसभेची निवडणूक जाहीर झाल्यानंतर राज्याच्या राजकारणात अनेक घडामोडींना वेग आला आहे. महाविकास आघाडी आणि महायुतीमधील पक्षाच्या नेत्यांमध्ये सध्या बैठकांचा धडाका सुरु आहे.**



लवकरच जागावाटपही जाहीर होणार असल्याचं सांगण्यात येत आहे. यातच अनेक नेते एका पक्षातून दुसऱ्या पक्षात प्रवेश करत असल्याचंही पाहायला मिळत आहे. अशातच ऐन निवडणुका जाहीर झाल्यानंतर उपमुख्यमंत्री अजित पवार यांना धक्क्यावर धक्के बसत असल्याचं पाहायला मिळत आहे.आता राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाचे आमदार डॉ.राजेंद्र शिंगणे यांनी राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षात प्रवेश केला आहे. डॉ. राजेंद्र शिंगणे यांचा पक्ष प्रवेश आज मुंबईत शरद पवार, जयंत पाटील यांच्या उपस्थितीत पार पडला. त्यामुळे अजित पवारांना ऐन निवडणुकीत मोठा धक्का बसला आहे.गेल्या काही दिवसांपासून डॉ.राजेंद्र शिंगणे हे राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षात नाराज असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात होती. तसेच ते राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षात प्रवेश करणार असल्याची चर्चाही होती. याच अनुषंगाने डॉ.राजेंद्र शिंगणे यांनी काही दिवसांपूर्वी शरद पवार यांची भेट देखील घेतली होती. यानंतर त्यांनी प्रतिक्रिया देत मतदारसंघातील नागरिकांच्या आणि कार्यकर्त्यांच्या भावना जाणून घेत आपण पुढचा निर्णय घेणार असल्याचं सूचक विधान केलं होतं. त्यानंतर आज अखेर डॉ.राजेंद्र शिंगणे यांनी राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षात प्रवेश केला.माजी मंत्री आणि आमदार डॉ.राजेंद्र शिंगणे यांचा शरद पवारांच्या राष्ट्रवादीत प्रवेश हा अजित पवारांच्या राष्ट्रवादीसाठी हा मोठा धक्का मानला जात आहे. डॉ.राजेंद्र शिंगणे हे सिंदखेडराजा मतदारसंघाचे विद्यमान आमदार आहेत. राजेंद्र शिंगणे यांनी शरद पवारांच्या राष्ट्रवादीत प्रवेश केल्यानंतर आता त्यांना पुन्हा एकदा सिंदखेडराजा मतदारसंघामधून उमेदवारी मिळण्याची शक्यता आहे. दरम्यान, राजेंद्र शिंगणे यांच्या विरोधात त्यांची पुतणी गायत्री शिंगणे बंडाच्या तयारीत असल्याची चर्चा आहे.काही दिवसांपूर्वी आमदार रामराजे नाईक निंबाळकर यांचे बंधू आणि सातारा जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष संजीवराजे नाईक निंबाळकर यांच्यासह शेकडो कार्यकर्त्यांनी १४ ऑक्टोबर रोजी राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाची साथ सोडत राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षात प्रवेश केला. तसेच फलटणचे आमदार दीपक चव्हाण यांनी देखील राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षात प्रवेश केला होता.

### अजित पवारांना फलटणमध्ये धक्का

लवकरच जागावाटपही जाहीर होणार असल्याचं सांगण्यात येत आहे. यातच अनेक नेते एका पक्षातून दुसऱ्या पक्षात प्रवेश करत असल्याचंही पाहायला मिळत आहे. अशातच ऐन निवडणुका जाहीर झाल्यानंतर उपमुख्यमंत्री अजित पवार यांना धक्क्यावर धक्के बसत असल्याचं पाहायला मिळत आहे.आता राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे आमदार डॉ.राजेंद्र शिंगणे यांनी राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षात प्रवेश केला आहे. डॉ. राजेंद्र शिंगणे यांचा पक्ष प्रवेश आज मुंबईत शरद पवार, जयंत पाटील यांच्या उपस्थितीत पार पडला. त्यामुळे अजित पवारांना ऐन निवडणुकीत मोठा धक्का बसला आहे.

## भोसरी विधानसभा : शिवसेना नेत्या सुलभा उबाळे यांची खंत

# “आम्ही फक्त पायरी म्हणून राहायचे का?”

### निष्ठावंत शिवसैनिकांना न्याय मिळावा, पक्षश्रेष्ठींकडे मागणी

। पिंपरी-चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज

**पक्षवाढीसाठी प्रवेश होत असतील, तर त्याचे स्वागत आहे. मात्र, निवडणुकीत उमेदवारी मिळवण्यासाठी प्रवेश होणार असतील, तर निष्ठावंतानाही विश्वासात घेतले पाहिजे. महाविकास आघाडीचे उमेदवार म्हणून शिरुर लोकसभा मतदार संघातून डॉ. अमोल कोल्हे निवडणूक लढले. त्यावेळी राष्ट्रवादीचा एकही मोठा पदाधिकारी काम करण्यासाठी तयार नव्हता. शिवसैनिकांनी ही निवडणूक हाती घेतली आणि निष्ठेने काम केले. मात्र, आता खासदार अमोल कोल्हे भेटायलासुद्धा तयार नाहीत. आम्ही फक्त पायरी म्हणून रहायचे काय? अशी खंत शिवसेना ठाकरे गटाच्या जिल्हा संघटिका सुलभा उबाळे यांनी व्यक्त केली आहे.**



तसेच, पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्याकडून आम्हाला अपेक्षा आहेत. याबाबत निष्ठावंतांना विश्वासात घ्यावे. या करिता मेल पाठवला आहे. त्यांची वेळ मिळाली की आम्ही सर्व बाबी त्यांच्यासमोर मांडणार आहोत, असेही उबाळे यांनी म्हटले आहे.

पिंपरी-चिंचवडमध्ये ठाकरे गटाचे अस्तित्व संपवण्यासाठी काही राजकीय नेत्यांनी अभद्र युती केली आहे. त्यामुळे विधानसभा निवडणुकीत निवडून येणारी जागा घ्यावी. तसेच, उमेदवारी आणि निवडणुकीसाठी ‘इनकमिंग’ करताना निष्ठावंत शिवसैनिकांवर अन्याय होणार नाही, याची काळजी घ्यावी, अशी मागणी शिवसेना ठाकरे गटातील निष्ठावंतांकडून केली जात आहे. शिवसेना महिला संघटीका सुलभा उबाळे म्हणाल्या की, पक्षवाढीसाठी प्रवेश होत असतील, तर त्याचे स्वागत आहे. मात्र, निवडणुकीत उमेदवारी मिळवण्यासाठी प्रवेश होणार असतील, तर निष्ठावंतानाही विश्वासात घेतले पाहिजे. महाविकास आघाडीचे उमेदवार म्हणून शिरुर लोकसभा मतदार संघातून डॉ. अमोल कोल्हे निवडणूक लढले. त्यावेळी राष्ट्रवादीचा एकही मोठा पदाधिकारी काम करण्यासाठी तयार नव्हता. शिवसैनिकांनी ही निवडणूक हाती घेतली आणि निष्ठेने काम केले. मात्र, आता खासदार अमोल कोल्हे भेटायलासुद्धा तयार नाहीत. आम्ही फक्त पायरी म्हणून रहायचे काय? असा प्रश्न आहे. पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्याकडून आम्हाला अपेक्षा आहेत. त्यामुळे पिंपरी विधानसभेसह भोसरी आणि चिंचवडमध्ये महाविकास आघाडीत जागा वाटपावरुन वाद निर्माण होण्याची शक्यता आहे.

कारण, पूर्वी शिवसेनेतून हकालपट्टी करण्यात आलेल्या माजी नगरसेवकांना निवडणुकीच्या तोंडावर प्रवेशाला विरोध करण्यासाठी निष्ठावंतांकडून वज्रमूठ करण्यात आली आहे. त्यासाठी पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांची वेळ मिळवण्यासाठी ‘मेल’ केला असून, लवकरच निष्ठावंत पदाधिकारी त्यांची भेट घेणार आहेत. विशेष म्हणजे, शहरातील तीन मतदार संघामध्ये पक्षाचे सक्षम उमेदवार आहेत. पण, निवडून येण्याची क्षमता असलेल्या ठिकाणी पक्षाचे जागा घ्यावी, अशी मागणीही जोर धरु लागली आहे.

### उमेदवारीवरुन पेच होण्याची शक्यता...

भोसरी विधानसभा मतदार संघातून निवडणुकीच्या निमित्ताने अजित गव्हाणे यांनी काही दिवसांपूर्वी राष्ट्रवादी शरद पवार गटात प्रवेश केला आणि निवडणुकीची तयारी केली. तसेच, भाजपातील माजी नगरसेवक रवि लांडगे यांनीही भाजपातून शिवसेना ठाकरे गटात प्रवेश केला आहे. गव्हाणे आणि लांडगे हे दोन्ही उमेदवार विधानसभेसाठी इच्छुक आहेत. मात्र, शिवसेना ठाकरे गटाच्या निष्ठावंत म्हणून सुलभा उबाळे यांनीही निवडणुकीची तयारी केली आहे. त्यामुळे महाविकास आघाडीची उमेदवारी कोणाला मिळणार? याबाबत चर्चा रंगली आहे. महाविकास आघाडीच्या जागावाटपामध्ये पिंपरी आणि भोसरी हे दोन मतदार संघ ठाकरे गटाला मिळतील, असा अंदाज वर्तवला जात आहे. त्यामुळे दोन्हीपैकी किमान एका मतदार संघामध्ये निष्ठावंत शिवसैनिकाला उमेदवारी मिळावी, अशी अपेक्षा निष्ठावंतांमधून व्यक्त होत आहे. परिणामी, भोसरी आणि पिंपरीतील महाविकास आघाडीच्या उमेदवारीवरुन पेच निर्माण होईल, असे राजकीय जाणकार सांगतात.

### गावकी-भावकी बनसोडे यांच्या पाठिशी..

पिंपरी विधानसभा मतदार संघात राष्ट्रवादी अजित पवार गटाचे विद्यमान आमदार आण्णा बनसोडे विरुद्ध महाविकास आघाडीकडून राष्ट्रवादी शरद पवार गटाच्या सुलक्षणा शिलवंत, भाजपाच्या माजी नगरसेविका सीमा सावळे, ठाकरे गटाचे माजी आमदार ॲड. गौतम चाबुकस्वार, शहर प्रमुख ॲड. सचिन भोसले, माजी नगरसेवक जितेंद्र ननावरे, राष्ट्रवादी शरद पवार गटाचे मयूर जाधव, देवेंद्र तायडे असे अनेकजन इच्छुक आहेत. मात्र, पिंपरी, दापोडी, आकुर्डी, चिंचवड या भागातील स्थानिक कायम बनसोडे यांच्या पाठिशी राहिले आहेत.

## आ. महेश लांडगे यांच्या विजयासाठी थेट श्री केदारनाथ चरणी साकडे!

### पिंपरी-चिंचवडमधील प्रसिद्ध बांधकाम व्यवसायिक संतोष बारणे यांच्या वतीने श्री क्षेत्र केदारनाथ येथे प्रार्थना

। पिंपरी । प्रतिनिधी : महाईन्यूज

**भोसरी विधानसभा मतदार संघातील भाजपाचे आमदार महेश लांडगे यांच्या विधानसभेच्या निवडणुकीतील विजयासाठी पिंपरी-चिंचवड शहरातील प्रसिद्ध बांधकाम व्यावसायिक व सामाजिक कार्यकर्ते संतोष बारणे यांनी थेट केदारनाथ चरणी साकडे घालत, श्री केदारनाथांचे दर्शन घेतले आहे. श्री केदारनाथाचे आशीर्वाद घेतल्यानंतर त्यांनी आमदार महेश लांडगे यांच्या प्रचाराची सुरुवात केली असल्याचे दिसून येत आहे. यावेळी संतोष बारणे यांच्यासह जगद्गुरू संत तुकाराम महाराजांचे वंशज शशिकांत महाराज मोरे, वरिष्ठ मुलाखतकार भाऊसाहेब कोकाटे, सामाजिक कार्यकर्ते राकेश गायकवाड व सहकारी उपस्थित होते.**




मोशीतील उद्योजक संतोष बारणे हे एक प्रसिद्ध बांधकाम व्यावसायिक असून सिल्वर ग्रुपचे ते संचालक आहेत त्याचबरोबर कर्तव्यम सोशल फाउंडेशनचे ते अध्यक्ष असून विविध सामाजिक कार्यात ते अग्रणी भूमिका बजावतात.

आमदार महेश लांडगे यांनी गेल्या दहा वर्षांच्या कार्यकाळात मतदारसंघाचा तसेच समाविष्ट गावांचा प्रचंड विकास केला असून अनेक महत्वाकांक्षी प्रकल्प त्यांनी राबविले आहेत शिवाय वर्षानुवर्षे प्रलंबित असणारे आंद्रा भामा पाणीपुरवठा, शास्तिकर सरसकट माफी साडेबारा टक्के परतावा, प्राधिकरण बाधित मिळकती फ्री होल्ड करण्याचा निर्णय असे विविध प्रश्न मार्गी लावले आहेत.. त्यामुळे भोसरी विधानसभेतील विकासाच्या पाठीशी ठाम उभी राहील असा विश्वास संतोष बारणे यांनी महाईन्यूज शी बोलताना व्यक्त केला. भोसरी मतदारसंघात गेल्या दहा वर्षात केलेली विविध विकासकामे तसेच सोडविलेले विविध प्रलंबित प्रश्न घेऊन आमदार महेश लांडगे मतदारांकडे पुन्हा एकदा जनसेवेच्या संधी देण्याचे आवाहन करत आहेत. त्याला नागरिकांकडून मोठा पाठिंबा मिळत आहे.

### आपुलकीच्या गाठी भेटी घेण्यास सुरुवात

महाराष्ट्रात विधानसभा निवडणूक कार्यक्रम नुकताच जाहिर झाला असून सर्वत्र प्रचाराला आता सुरवात झाली आहे, भोसरी विधानसभेचे आमदार महेश लांडगे यांनीही भोसरी परिसरात आपुलकीच्या गाठी भेटी घेण्यास सुरुवात केली आहे. त्यांच्या प्रचार दौऱ्यांना भोसरी मतदारसंघात जनतेकडून मोठ्या उत्साहात प्रतिसाद मिळत आहे. त्यांच्या प्रचार सभांमध्ये स्थानिक नागरिकांची व समर्थकांची मोठी उपस्थिती असून, लांडगे यांच्यावरचा जनतेचा विश्वास आणि प्रेम प्रचार दौऱ्यातून दिसून येत आहे.



## भूमिका

# तंत्रज्ञानाचा परीघ वाढत चाललाय

**तंत्रज्ञानाचा परीघ वाढत चाललाय. सगळ्यात वेग आहे तो दळण-वळणाच्या तंत्रज्ञानाचा बदलाचा. माणसं किती किती मार्गांनी एकमेकांच्या संपर्कात असतात आता. अगदी अफ्रिका ते अंटार्टिका... कुठूनही कुठेही कुणाशीही कधीही संपर्क साधता येऊ शकतो आपल्याला. जग जवळ आलंय वगैरे म्हणतात ते हेच. पण कोणी कोणाच्या जवळ आलं म्हणून अंतर कमी होतंच असं नाही...!**

गेल्या आठवड्यात उत्तर महाराष्ट्रात सामाजिक चळवळीत चांगली ऊठबस असलेले एक कार्यालयात आले होते... आणि हे सत्य भोसकून गेलं!!हवा-पाण्याच्या, पीक-पाण्याच्या गप्पा झाल्यावर सहज काही तरी विषय निघाला आणि हे म्हणाले... आमच्या गावचे बरेचसे तरुण हल्ली पुण्यातच असतात. आईवडिलांना फार घोर लागून राहिलाय यांचा... फार वाईट परिस्थिती आहे गावाकडे...आता कोणाची तरी मुलं/ मुली पुण्याला असतात त्यात इतकं चिंता करावं असं काय आहे... ते ज्या भावना व्यक्त करतायत त्या अतिरंजित आहेत, असं वाटून गेलं. हल्ली इतक्यांची मुलं/मुली कुठे कुठे जात असतात शिकायला/ नोकरी करायला वगैरे... यात इतकी अशी काळजी करावी असं काय... असे काही विचार मनात येत होते. त्यामुळे त्यांच्या बोलण्यावरचं लक्ष उडालं. त्यांनाही ते लक्षात आलं असावं. ते थांबले. आपण



लक्ष देत नाहीये हे समोरच्याला कळलंय हे लक्षात आल्यावर मलाच खजील झाल्यासारखं वाटलं. म्हटलं हे बरोबर नाही. ते म्हणतायत त्यात काही तरी तथ्य असणार... ते होतं... आपल्या सगळ्यांना काळजी वाटायला हवी इतकं त्यांचं म्हणणं महत्त्वाचं होतं. तर त्यांच्याच भागातली असं नाही, राज्याच्या अनेक भागांतली मुलं/ मुली पुण्यासारख्या शहरात येऊन राहात असतात. पुण्यात ज्यांना जमत नाही ते औरंगाबाद वगैरे शहरांत एकमेकांना धरून राहात असतात. ही अशी विद्यार्थ्यांची गर्दी या शहरांत कशी वाढलीय यावर ‘लोकसत्ता’नं मागे एक मालिकाही केली होती. हे विद्यार्थी या गावांत इतक्या संख्येनं येऊन राहतात याला, जे भेटायला आले होते त्यांचा; आक्षेप नव्हता. त्यांचं म्हणणं इतकंच होतं की ही पोरं परत गावाकडे येत नाहीत. त्या मुला/ मुलींच्या आईवडिलांच्या जिवाला लागलेला घोर पोटचं पोर दूर गेलंय म्हणून नाहीये. तर शहरांत राहून ही मुलं करतायत काय... हा प्रश्न होता. त्याचं उत्तर त्या मुलांच्या पालकांना मिळत नव्हतं. मिळत नाही. म्हणून ते अस्वस्थ आहेत. पण हे उत्तर त्यांना मिळणार तरी कसं?ही मुलंदेखील ते देऊ शकत नाहीत. कारण ते काहीच करत नाहीत. फक्त परीक्षा देत असतात. एक झाली की दुसरी. मग तिसरी. चौथी... असं सुरूच. या परीक्षेचा निकाल लागण्याआधी पेपर फुटलेला असतो. नाही तर निकालात गोंधळ होतो. आणि यातलं काहीही झालं नाही आणि परीक्षेत यश मिळालं तरी ज्यासाठी परीक्षा दिली तो उद्देश काही पूर्ण होत नाही. कारण सरकारकडून भरतीचे आदेशच निघत नाहीत. ही महाराष्ट्रातल्या लाखो ‘एमपीएससी’ग्रस्त परीक्षार्थींची अवस्था आहे. ‘महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोग’ या सरकारी भरतीसाठीच्या यंत्रणेकडून घेतल्या जाणाऱ्या परीक्षांसाठी हे तरुण गावातनं पुणे/ औरंगाबादेत वगैरे आलेले असतात. अशा विविध परीक्षांना बसणाऱ्या तरुणांची संख्या २५ लाखांच्या वर तरी असेल. अलीकडे पोलीस भरतीसाठी यावेळी ११ लाख अर्ज आले होते आणि पोलीस उपनिरीक्षकाच्या फक्त २१६ जागा निघाल्या. हीच संख्या २०११ साली १८६९ इतकी होती. इतक्या जागा आणि इतके सारे परीक्षार्थी कसं होणार...?त्यात चार वर्षांपूर्वीच्या करोना फेऱ्यानं या विद्यार्थ्यांचं आणखी नुकसान केलं. भरतीच झाली नाही. म्हणजे शहराकडचं सगळं राहणं वायाच. मग सरकारनं काय चलाखी केली? तर नोकऱ्यांचं वय वाढवून दिलं.

म्हणजे खुल्या वर्गातल्या तरुण/ तरुणीला या परीक्षांचं दळण वय ३८ होईपर्यंत दळता येतं आणि राखीव जागातल्यांना ते ४३ पर्यंत! नोकऱ्या देणार नाही, असं नाही सांगितलं सरकारनं. मतदार रागावले असते ना! त्यापेक्षा परीक्षा देण्याचं वयच वाढवून दिलं... द्या परीक्षा हव्या तेवढ्या...काय भयानक वास्तव आहे हे! वयाच्या चाळिशीपर्यंत सरकारी नोकरीच्या परीक्षाच देत बसायचं? इतकं थांबून नोकऱ्या मिळत नाहीत त्या नाहीतच. पण नोकरीला सुरुवात करायचं वयही हातून निघून जातं.

## प्रासंगिक »

### न्यायदेवता...!

***न्यायदेवतेच्या डोळ्यांवरील पट्टी काढल्याचा आनंदीआनंद भारतवर्षात पसरला आहे.***

आता या न्यायदेवतेला सारे काही दिसू लागेल, अशी आशा व्यक्त केली जाते आहे. यास निमित्त आहे ते सर्वोच्च न्यायालयातील ‘न्यायाधीश ग्रंथालया’च्या एका कोनाड्यात न्यायदेवतेची मूर्ती म्हणून आता एक पांढरीशुभ्र शिल्पकृती ठेवली गेल्याचे. ती कोणी ठेवली, कोणी घडवली याबद्दल काहीही अधिकृतपणे सांगितले जात नसले तरी ही मूर्ती आताच चर्चेत आली आहे, एवढे खरे. तिच्या अंगावर साडी आहे- नेसणे राजा रविवर्मा यांच्या चित्रांतल्या देवींसारखे, चेहरा तसाच आणि डोईवरील महिरपी मुकुटही भारतीय शैलीचाच- असे रूप असलेल्या या मूर्तीच्या एका हातात तराजू असला भारताचे संविधान.आता निराळे सांगावेच लागणार नाही. ती इतकी पांढरीशुभ्र आहे की, तूर्तास घाईघाईने प्लास्टर ऑफ पॅरिसमध्ये घडवलेले ते प्रारूप असावे. पुढे कदाचित त्याआधारे धातूच्या मूर्ती घडवल्या जातील मग तशाच आणखीही मूर्ती घडतील, मूर्ती बाजारात विक्रीसाठी उपलब्धसुद्धा असतील.

कोरडवाहू शेतीचे प्रश्न सोडवायचे सध्या दोनच मार्ग आहेत असे सुचविले/भासविले जाते. मोठे सिंचन प्रकल्प सुरू करून तिला बागायती बनवा आणि दुसरा म्हणजे पीक बदल करून काही काळ आश्वस्त वातावरण निर्माण करा! खरीप हंगामातील जवळपास ६५ टक्के पारंपरिकसोयाबीन हे एकच पीक घेतले जाते.

# कडधान्यांची टंचाई रोखणार कशी?

मराठवाड्यातील काही जिल्ह्यांत हे प्रमाण ८० टक्केपर्यंत पोहोचले आहे. मूग, मटकी, हुलगा, खरीप ज्वारी, तूर, उडीद यांच्याखालील सर्व क्षेत्र सोयाबीन या एकाच पिकाने व्यापले आहे. आपल्या देशाची कडधान्ये आयात २०१९ पासून सातत्याने वाढत आहे. २०२३-२४ मध्ये डाळींची आयात दुपटीने वाढली आहे. ब्राझील या एकाच देशातून फक्त उडदाची २० हजार टन आयात झाली आहे. तर मोझांबिक, म्यानमारसारख्या गरीब देशांतूनही आपण डाळी आयात करीत आहोत. मागील वर्षी जवळपास २८ हजार कोटी त्यासाठी खर्चले आहेत. अन्न आणि पोषण सुरक्षेच्या दृष्टीने महत्त्वाच्या असलेल्या डाळी पिकविण्यास शेतकरी धजावत नाहीत हेही तितकेच खरे! सध्या सोयाबीनचे दर नीचांकी पातळीवर असल्याने त्याच्या बाजारभावाचा मुद्दा चर्चेत आहे. नवीन सोयाबीन बाजारात आल्यानंतर त्याची धग वाढणार असे दिसते. उत्पादन वाढ आणि उत्पन्नाची किमान शक्यता जास्त असल्यामुळे कोरडवाहू शेतकऱ्यांच्या



दृष्टीने सोयाबीन हे महत्त्वाचे पीक आहे. यूएसडीए या आंतरराष्ट्रीय संस्थेच्या अंदाजानुसार जगातले अमेरिका, ब्राझील, अर्जेंटिना या प्रमुख सोयाबीन उत्पादक देशांमध्ये या वर्षी सोयाबीनच्या चांगल्या उत्पादनाचे अंदाज आहेत. सोयाबीन उत्पादन हा काहीसा किचकट मुद्दा आहे, कारण आपल्याकडे सोयाबीनची काढणी सुरू असते त्या वेळी अमेरिकेमधील सोयाबीन फुलोऱ्यात असते, ब्राझीलचे खळे जानेवारीत सुरू होते तर अर्जेंटिनाचे सोयाबीन बाजारात येण्यासाठी एप्रिल उजाडतो. त्यामुळे बदलते हवामान, मागील वर्षीचा साठा आणि भारतासारख्या देशामध्ये होत असलेली ‘पेरणी क्षेत्रातील वाढ’ अशा कोणत्याही एका घटकामुळे बाजारातील चढ-उताराला सुरुवात होते. दोन वर्षांपूर्वी आपल्याकडे भाव होता दहा हजार. त्या वेळी ब्राझीलचे उत्पादन अपेक्षेपेक्षा फार कमी झाले. थोडक्यात सोयाबीन या पिकाला इतर पिकांच्या तुलनेत आंतरराष्ट्रीय घडामोडीची परिमाणे जास्त आहेत. सोयाबीनला सध्या मागील दहा वर्षांपूर्वीपेक्षाही कमी बाजारभाव मिळत आहे. सरकारी हमीभावापेक्षाही कमी दर असल्यामुळे सरकारला हस्तक्षेप करून पुढील ९० दिवस हमीभावाने खरेदी होण्यासाठीच्या उपाययोजना कराव्या लागत आहेत. सोयाबीन उत्पादन-उत्पन्न हा मुद्दा दरवर्षी कधी अतिवृष्टी, कधी बियाणे टंचाई अशा वेगवेगळ्या कारणांनी चर्चेत असतो. तरीही त्या पिकाखालील क्षेत्र वाढत आहे. दर हेक्टरी उत्पादकता (ब्राझील-३५ क्विंटल, चीन २५ क्विंटल, अमेरिका ३७ क्विंटल, अर्जेंटिना-३० क्विंटल, भारत-१५ क्विंटल) यामध्ये आपण फार मागे आहोत परंतु क्षेत्र वाढ होऊन एकूण उत्पादनामध्ये पहिल्या पाच देशांमध्ये आहोत.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# तुमचा दादा तसूभरही कमी नाही!

## अजित पवारांचे लाडक्या बहिणींसाठी खास आवाहन!

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेअंतर्गत राज्यभरातील २ कोटी २८ लाख पात्र महिलांना सन्मान निधी मिळाला आहे. आतापार्यंत ५ हप्त्यांचे पैसे मिळाले असून आचारसंहितेच्या काळात नवीन अर्ज स्वीकारणे थांबवण्यात आले आहे. दरम्यान, निवडणूक प्रचारात विरोधकांनी या योजनेवर टीका केली. तसंच निवडणुकीपुरती ही योजना असल्याचंही विरोधकांनी म्हटलं आहे. विरोधकांच्या या टीकेवर राज्याचे उपमुख्यमंत्री आणि अर्थमंत्री अजित पवार यांनी सोशल मीडियावर पोस्ट करून पात्र महिलांना दिलासा देण्याचा प्रयत्न केला आहे.**



अजित पवार म्हणाले, “गेल्या काही आठवड्यात तुम्ही मला जे प्रेम आणि माया दिली, त्यासाठी मी तुमचा ऋणी आहे. दरवर्षी राखीपौर्णिमेला प्रत्येक बहीण आपल्या भावाला राखी बांधते. तुम्ही मला हजारो राख्या बांधून जगातील भाग्यशाली दादा बनवलं आहे. मी कधीही विसरू शकणार नाही, तुम्ही दिलेल्या प्रेमाने आणि माझ्यावर दाखवलेल्या विश्वासाने माझ्यावरील जबाबदारी लाखपटीने वाढली आहे. तुमचा विश्वास सार्थ ठरवण्यासाठी, तुम्हाला लाभ आणि बळ देण्यासाठी तुमचा दादा तसूभरही कमी पडणार नाही. हा माझा वादा आहे. आणि तो मी शेवटपर्यंत निभावणार.“तीन महिन्यांपूर्वी महायुती सरकारच्या वतीने राज्याचा अर्थसंकल्प सादर केला तेव्हा लाडक्या बहिणींसाठी महत्त्वाच्या योजना जाहीर केल्या. योजनांचा घोषणा करून मी थांबलो नाही तर योजनांची अंमलबजावणी केली. सर्वात महत्त्वाची योजना म्हणजे लाडकी बहीण योजना. माय माऊलींना स्वतःच्या पायावर उभं करण्याकरता मी अर्थमंत्री म्हणून उचललं पाऊल सगळ्यात मोठं पाऊल होतं”, असंही अजित पवार म्हणाले.“दुर्दैवाने आमचे विरोधक लाडकी बहीण योजनेसंबंधित माझ्या माय माऊलींच्या मनात भ्रम पसरवत आहेत. लाडकी बहीण योजना मी जाहीर केली तेव्हा विरोधक म्हणत होते की या योजनेची अंमलबजावणी शक्य नाही. जेव्हा आम्ही या योजनेची अंमलबजावणी सुरू केली आणि माझ्या माय माऊलींनी आनंदाने योजनेचे फॉर्म भरायला सुरुवात केली तेव्हा विरोधक म्हणू लागले की फॉर्म भरून घेतील पण खात्यात पैसेच येणार नाहीत. जेव्हा बहिणींच्या खात्यात ५ महिन्यांचे साडेसात हजार रुपये जमा झाले, तेव्हा भेदरलेले आणि घाबरलेले विरोधक म्हणू लागले की आता पैसे आले तरी निवडणुकीनंतर येणार नाहीत. आमचे विरोधक नेहमीच खोटा आणि बिनबुडाचा प्रचार करतात आणि तुमचा दादा तुम्हाला दिलेल्या शब्दाप्रमाणे तुमच्या खात्यात पैसे जमा करत राहिला. आणि या पुढेही तुमच्या खात्यात दर महिन्याला न चुकता पैसे येत राहतील”, असं अजित पवारांनी आश्वासित केलं.राखीपौर्णिमेला बहिणींना ओवाळणी दिली तशीच भाऊबीजेलाही दिली. येत्या विधानसभा निवडणुकीच्या नंतर महायुतीचं सरकार लाडकी बहीण योजनेची रक्कम वाढवण्याचा प्रयत्न करेल. महिलांसाठी उचलेलं हे ऐतिहासिक पाऊल असेल. याला जोडूनच माझ्या बहिणींना सांगू इच्छितो की विरोधकांनी सांगितलंय की निवडणूक संपल्यानंतर ही योजना बंद करतील. परंतु, तुम्ही बांधलेल्या प्रत्येक राखीची शपथ घेऊन सांगतो की, तुमचा हा दादा ही योजना बंद होऊ देणार नाही”, असा विश्वासही अजित पवारांनी पात्र महिलांना दिला. “निवडणुकीच्या वेळी विविध पक्ष एकमेकांवर आरोप करतात. हल्ले करतात. परंतु, विरोधक लाडकी बहीण योजनेबद्दल माय माऊलींचा अपमान करत आहेत. भीतीचं वातावरण पसरवत आहेत. पूर्वी विरोधकांनी सांगितलं की पैसे मिळणारच नाहीत. आता म्हणत आहेत पैसे का देत आहे? विरोधक म्हणत आहेत महिलांना थेट पैसे देणं व्यर्थ आहे. पण मी विरोधकांना सांगू इच्छितो की मागच्या दोन महिन्यांत मला काही भगिनी भेटल्या. काहींनी राखी सोबत पत्री पाठवलं. त्या प्रत्येक संवादात, त्या प्रत्येक पत्रात माझी भगिनी त्यांना मिळत असलेल्या रक्कमेतून त्या काय करणार हे सांगत होत्या”, असं अजित पवारांनी सांगितलं.“विरोधकांना माझी हात जोडून विनंती आहे मला जी शिवीगाळ करायची आहे ती निश्चित करा. पण लाडकी बहीण योजनेच्या माध्यमातून करोडो कुटुंबातील स्वप्न जोडले गेले आहेत, त्यामुळे खोटी माहिती पसरवून स्वप्नांची राखरांगोळी करू नका. माय माऊली या योजना बंद करण्याचं स्वप्न पाहणाऱ्यांना धडा शिकवतील”, असंही ते म्हणाले.

### स्वप्नांची राखरांगोळी करू नका

.राखीपौर्णिमेला बहिणींना ओवाळणी दिली तशीच भाऊबीजेलाही दिली. येत्या विधानसभा निवडणुकीच्या नंतर महायुतीचं सरकार लाडकी बहीण योजनेची रक्कम वाढवण्याचा प्रयत्न करेल. महिलांसाठी उचलेलं हे ऐतिहासिक पाऊल असेल. याला जोडूनच माझ्या बहिणींना सांगू इच्छितो की विरोधकांनी सांगितलंय की निवडणूक संपल्यानंतर ही योजना बंद करतील. परंतु, तुम्ही बांधलेल्या प्रत्येक राखीची शपथ घेऊन सांगतो की, तुमचा हा दादा ही योजना बंद होऊ देणार नाही”, असा विश्वासही अजित पवारांनी पात्र महिलांना दिला. हल्ले करतात. परंतु, विरोधक लाडकी बहीण योजनेबद्दल माय माऊलींचा अपमान करत आहेत. भीतीचं वातावरण पसरवत आहेत.

# निवडणुकीपूर्वी मुख्यमंत्री पुन्हा गुवाहाटीला जाणार

## कामाख्या देवीच्या मंदिरात नारळ फोडल्यानंतर प्रचार

। अमरावती ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**राज्यात विधानसभा निवडणुकांचे बिगुल वाजले आहे. २० नोव्हेंबर रोजी विधानसभा निवडणुकांसाठी मतदान होणार आहे. त्यासाठी प्रत्येक पक्ष जोरदार तयारीला लागला आहे. जागावाटपाची चर्चा सुरू आहे. अशातच आता मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे पुन्हा एकदा गुवाहाटीला जाणार असल्याची बातमी समोर येत आहे.**



२०२२ साली जेव्हा शिवसेनेपासून एकनाथ शिंदे आणि त्यांच्या सहकारी आमदारांनी फारकत घेतली होती. तेव्हा सूरत आणि त्यानंतर गुवाहाटीचा दौरा केला होता. सत्तांतराच्या हालचालीत गुवाहाटीचा दौरा चांगलाच गाजला. त्यातच आमदार शहाजीबापू पाटील यांच्या “काय झाडी, काय डोंगर, काय ते हॉटेल” या डायलॉगमुळे जनसामान्यांमध्येही गुवाहाटीची खमंग चर्चा रंगली होती. आता पुन्हा एकदा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे गुवाहाटीला जात आहेत. गुवाहाटीचा दौरा केल्यानंतर एकनाथ शिंदे यांच्या गळ्यात मुख्यमंत्रीपदाची माळ पडली होती. त्यामुळेच त्यांनी मुख्यमंत्री झाल्यानंतर गुवाहाटीमधील कामाख्या देवीचे दर्शन घेतले होते. आता पुन्हा एकदा विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर ते गुवाहाटीला जाऊन कामाख्या देवीचे दर्शन घेणार असल्याचे कळते. प्रचाराचा नारळ कामाख्या देवीच्या मंदिरात फोडल्यानंतर ते राज्यात प्रचारचे रणशिंग फुंकणार असल्याचे सांगितले जाते.

### देवीमुळे आमचा उठाव यशस्वी

यावर शिवसेना (एकनाथ शिंदे) पक्षाचे आमदार संजय शिरसाट यांनीही प्रतिक्रिया दिली आहे. संजय शिरसाट यांनी घेतलेल्या पत्रकार परिषदेत त्यांना मुख्यमंत्री शिंदेंच्या दौऱ्याबाबत प्रश्न विचारला गेला. त्यावर ते म्हणाले की, मीही शिंदे यांच्या दौऱ्याबाबत ऐकले. जर मुख्यमंत्री गुवाहाटीला जाऊन कामाख्या देवीचे दर्शन घेणार असतील तर चांगलेच आहे. कामाख्या देवीच्या दर्शनाला जाणे काही गैर नाही. कामाख्या देवीच्या आशीर्वादामुळे आमचा उठाव यशस्वी झाला. काही लोक आमचा पोस्टमॉर्टम करणार होते, त्यांना कामाख्या देवीचा शाप लागला.

# बिश्नोईच्या कुटुंबाकडे शेकडो एकर जमीन!

## सिद्दीकी यांच्या हत्येनंतर लॉरेन्स बिष्णोई नाव चर्चेत

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**राष्ट्रवादी कॉंग्रेसचे (अजित पवार गट) नेते आणि माजी मंत्री बाबा सिद्दीकी यांच्या हत्येनंतर गँगस्टर लॉरेन्स बिष्णोई हे नाव चांगलच चर्चेत आलं आहे. त्याआधी अभिनेता सलमान खानच्या घराबाहेर गोळीबार झाल्याची घटना घडली होती, तेव्हाही लॉरेन्स बिष्णोई हे नाव चर्चेत होतं. या दोन्ही प्रकरणात लॉरेन्स बिष्णोई टोळीने समाजमाध्यमांवरून या हल्ल्याची जबाबदारी स्वीकारली होती. दरम्यान, गेल्या काही वर्षांपासून गँगस्टर लॉरेन्स बिष्णोई हा तुरुंगात आहे. मात्र, लॉरेन्स बिश्नोई हा तुरुंगात असूनही टोळी कशी चालवतो? याबाबत अनेक प्रश्न उपस्थित करण्यात आले आहेत.**



गँगस्टर लॉरेन्स बिश्नोई हा नेमकी कुठला आहे? तो गँगस्टर कसा झाला? त्याचे कुटुंब काय करते? असे अनेक प्रश्न विचारले जात आहेत. आता यासंदर्भात गँगस्टर लॉरेन्स बिश्नोईचा चुलत भाऊ रमेश बिश्नोईने माहिती देताना सांगितलं की, “लॉरेन्स बिश्नोईचे कुटुंब श्रीमंत आहे. लॉरेन्सचे वडील हरियाणा पोलिसात हवालदार होते. त्यांची गावात ११० एकर जमीन आहे. बिश्नोई नेहमी महागडे कपडे आणि शूज घालत असे. खरं तर आताही त्याचे कुटुंब तुरुंगात त्याच्यावर वर्षाकाठी ३५ ते ४० लाख रुपये खर्च करते”, असं लॉरेन्स बिश्नोईचा चुलत भाऊ रमेश बिश्नोईने सांगितल्याचं एका वृत्तात इंडियन एक्स्प्रेसने म्हटलं आहे.तसेच जवळपास एका दशकापूर्वी लॉरेन्स बिश्नोईला आपण न्यायालयाच्या एका सुनावणीसाठी आणले होते, तेव्हा शेवटचे पाहिले होते, असंही रमेश बिश्नोईने म्हटलं आहे. तसेच लॉरेन्स बिश्नोईचे वडिलोपार्जित गाव पंजाबमधील फाजिल्का जिल्ह्यात असल्याचंही वृत्तात म्हटलं आहे. माहितीनुसार, लॉरेन्स बिश्नोई हा २००८ मध्ये पहिल्यांदा तुरुंगात गेला होता. तसेच तो महाविद्यालयात शिक्षण घेत असताना त्याने विद्यार्थी संघाच्या निवडणुकीदरम्यान प्रतिस्पर्ध्यावर गोळीबार केल्याचा आरोप करण्यात आला होता. लॉरेन्स बिष्णोईचा जन्म पंजाबमधील उच्चभ्रू कुटुंबात झाला आहे. अबोहर इथल्या कॉन्व्हेंट स्कूलमध्ये त्याने शिक्षण घेतले. त्याचे आई-वडील लविंदर आणि सुनिता सुरुवातीपासूनच श्रीमंत होते. त्यांची वडिलोपार्जित शेकडो एकर जमीन आहे. तसेच लॉरेन्सचे कुटुंबिय पदावर कार्यरत आहेत. लविंदर हे पोलीस हवालदार पदावर कार्यरत होते. त्याच्या वडिलांना त्याला पोलीस अधिकारी करायचे होते. पण लॉरेन्सने वेगळा मार्ग निवडला. महाविद्यालयात असतानाच त्याने विद्यार्थी संघटना स्थापन केली होती. त्या माध्यमातून पुढे त्याने टोळी उभी केली. चंडीगडमध्ये शिक्षणासाठी गेल्यावर लॉरेन्सचा गुन्हेगारी क्षेत्रात शिरकाव झाला. त्याच्या नावावर अनेक गुन्हे नोंद आहेत.प्रसिद्ध गायक सिद्धू मुसेवाला याच्या हत्येच्या प्रकरणातही लॉरेन्स बिष्णोईचा सहभाग होता, अशी माहिती समोर आली होती. त्या २०२२ मध्ये घडलेल्या प्रकरणानंतर बिष्णोई टोळी चर्चेत आली होती. पंजाबमधील गँगस्टर लॉरेन्स बिष्णोईचा कॅनडास्थित साथीदार गोल्डी ब्रार याने सिद्धू मुसेवालाच्या हत्येची जबाबदारी स्वीकारली होती. या हत्येनंतर बिष्णोई टोळी प्रथम देशपातळीवर चर्चेत आली. गँगस्टर लॉरेन्स बिश्नोई हा नेमकी कुठला आहे? तो गँगस्टर कसा झाला? त्याचे कुटुंब काय करते? असे अनेक प्रश्न विचारले जात आहेत. आता यासंदर्भात गँगस्टर लॉरेन्स बिश्नोईचा चुलत भाऊ रमेश बिश्नोईने माहिती देताना सांगितलं की, “लॉरेन्स बिश्नोईचे कुटुंब श्रीमंत आहे. लॉरेन्सचे वडील हरियाणा पोलिसात हवालदार होते. त्यांची गावात ११० एकर जमीन आहे. बिश्नोई नेहमी महागडे कपडे आणि शूज घालत असे. खरं तर आताही त्याचे कुटुंब तुरुंगात त्याच्यावर वर्षाकाठी ३५ ते ४० लाख रुपये खर्च करते”, असं लॉरेन्स बिश्नोईचा चुलत भाऊ रमेश बिश्नोईने सांगितल्याचं एका वृत्तात इंडियन एक्स्प्रेसने म्हटलं आहे.तसेच जवळपास एका दशकापूर्वी लॉरेन्स बिश्नोईला आपण न्यायालयाच्या एका सुनावणीसाठी आणले होते.

### सिद्धू मुसेवाला हत्येतही हात

शेवटचे पाहिले होते, असंही रमेश बिश्नोईने म्हटलं आहे. तसेच लॉरेन्स बिश्नोईचे वडिलोपार्जित गाव पंजाबमधील फाजिल्का जिल्ह्यात असल्याचंही वृत्तात म्हटलं आहे. माहितीनुसार, लॉरेन्स बिश्नोई हा २००८ मध्ये पहिल्यांदा तुरुंगात गेला होता. तसेच तो महाविद्यालयात शिक्षण घेत असताना त्याने विद्यार्थी संघाच्या निवडणुकीदरम्यान प्रतिस्पर्ध्यावर गोळीबार केल्याचा आरोप करण्यात आला होता. लॉरेन्स बिष्णोईचा जन्म पंजाबमधील उच्चभ्रू कुटुंबात झाला आहे. माहितीनुसार, लॉरेन्स बिश्नोई हा २००८ मध्ये पहिल्यांदा तुरुंगात गेला होता. तसेच तो महाविद्यालयात शिक्षण घेत असताना त्याने विद्यार्थी संघाच्या निवडणुकीदरम्यान प्रतिस्पर्ध्यावर गोळीबार केल्याचा आरोप करण्यात आला होता.

# इस्रायलचे पंतप्रधान नेत्यानाहूंच्या घरावर ड्रोन हल्ला

## शहरातील खासगी निवासस्थानाला ड्रोनने लक्ष्य करण्यात आले

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**हमास अतिरेकी संघटनेचा म्होरक्या याह्या सिनवार याचा खात्मा केल्यानंतर इस्रायलचे पंतप्रधान बिन्यामिन नेतान्याहू यांनी युद्ध थांबविण्याबाबत मोठे विधान केले होते. जर हमासने बंदी केलेल इस्रायलचे नागरिक परत केल्यास युद्ध थांबविण्याची तयारी दर्शविली होती. मात्र आता रॉयटर्सने दिलेल्या बातमीनुसार, पंतप्रधान नेतान्याहू यांच्या सिझेरिया शहरातील खासगी निवासस्थानाला ड्रोनने लक्ष्य करण्यात आले आहे.**

या हल्ल्याच्या वेळी नेत्यानाहू आणि त्यांच्या पत्नी घरी हजर नव्हत्या, अशी माहिती पंतप्रधान कार्यालयाच्या प्रवक्त्यांनी दिली आहे. तसेच या हल्ल्यात कुणीही जखमी झाले नसल्याचीही माहिती मिळत आहे. नेत्यानाहू यांच्या निवासस्थानाव्यतिरिक्त आणखी दोन ड्रोन लेबनानमधून डागले गेले होते. पण हवाई दलाने ते हाणून पाडले. या हल्ल्यानंतर आता राजधानी तेल अविवमध्ये पुन्हा एकदा सायरनचा आवाज घुमू लागला आहे. लेबनानमधून हा ड्रोन हल्ला केल्याचे सांगितले जात आहे. याह्या सिनवार याची हत्या केल्यानंतर दोनच दिवसांनी लेबनानकडून इस्रायलला लक्ष्य केल्याचे सांगितले जात आहे. हमासचे कंबरडे मोडल्यानंतर इस्रायलने लेबनानमधील हेझबोला संघटनेला लक्ष्य केले होते. २७ सप्टेंबर रोजी बैरुतमध्ये इस्रायलने हल्ला करून हेझबोलाचा प्रमुख हसन नसरल्लाह याला ठार केले होते. यानंतर हेझबोलाने इस्रायलचा सूड उगविण्याची शपथ घेतली होती. तेव्हापासून इस्रायल आणि लेबनान यांच्यात उघड युद्ध सुरू आहे. लेबनाने इस्रायलवर मध्यंतरी १८० क्षेपणास्त्रेही डागले होते. इस्रायल आणि हेझबोला यांच्या संघर्षामध्ये आतापर्यंत २,३५० लोकांचा मृत्यू झाला आहे, तर १०,९०६ लोक जखमी झाले आहेत.इस्रायली संरक्षण दलाने (आयडीएफ) रफाह येथे केलेल्या हल्ल्यात याह्या सिनवार मारला गेला असल्याचे इस्रायलने गुरुवारी सांगितले. इस्रायलच्या ड्रोन व्हिडीओमध्ये हल्ल्यानंतर याह्या सिनवार दिसत असल्याचा दावाही करण्यात आला आहे. ‘कसाई’ म्हटल्या जाणाऱ्या याह्या सिनवारचा हल्ल्यात मृत्यू झाल्याचा व्हिडीओ इस्रायलच्या लष्कराने शेअर केला असून त्यात याह्या सिनवार एका हवाई हल्ल्यात उद्ध्वस्त झालेल्या घरात जखमी अवस्थेत बसल्याचे दिसत आहे.



### कुणीही जखमी झाले नसल्याचीही माहिती

या हल्ल्याच्या वेळी नेत्यानाहू आणि त्यांच्या पत्नी घरी हजर नव्हत्या, अशी माहिती पंतप्रधान कार्यालयाच्या प्रवक्त्यांनी दिली आहे. तसेच या हल्ल्यात कुणीही जखमी झाले नसल्याचीही माहिती मिळत आहे. नेत्यानाहू यांच्या निवासस्थानाव्यतिरिक्त आणखी दोन ड्रोन लेबनानमधून डागले गेले होते. पण हवाई दलाने ते हाणून पाडले. या हल्ल्यानंतर आता राजधानी तेल अविवमध्ये पुन्हा एकदा सायरनचा आवाज घुमू लागला आहे. लेबनानमधून हा ड्रोन हल्ला केल्याचे सांगितले जात आहे.

# ‘साथिया’ साठी आम्हाला एका दिवसात चार सीन शूट करायचे होते

राणी मुखर्जी आणि विवेक ओबेरॉय यांची जोडी तब्बल २१ वर्षांपूर्वी ‘साथिया’ चित्रपटाच्या निमित्ताने जमली होती. राणीचे सलग काही चित्रपट फ्लॉप ठरल्याने विवेकबरोबरचा ‘साथिया’ तिच्या आयुष्यातील सर्वात मोठा टर्निंग पॉइंट ठरला. चित्रपट प्रदर्शित झाल्यावर या दोघांच्याही अभिनयाचं सर्वत्र भरभरून कौतुक करण्यात आलं. परंतु, प्रत्यक्षात या चित्रपटाचं शूटिंग करताना विवेकला अनेक अडचणींचा सामना करावा लागला होता. याविषयी त्याने नुकत्याच ‘ह्युमन्स ऑफ बॉम्बे’ला दिलेल्या मुलाखतीत खुलासा केला आहे. बॉलीवूडचा प्रसिद्ध दिग्दर्शक राम गोपाल वर्माने विवेकला हा चित्रपट करू नकोस असा सल्ला दिला होता. याविषयी सांगताना अभिनेता म्हणाला, “साथिया चित्रपट करून नकोस असा सल्ला मला प्रत्येकाने दिला. ‘तू ॲक्शन हिरो आहेस...प्रेमकथेत काम कसा करणार?’ असं सगळेजण बोलत होते. माझे गुरू राम गोपाल वर्मा देखील माझ्यावर संतापले होते. पण, त्यांच्याकडून परवानगी मागण्यापेक्षा, त्यांची




क्षमा मागून हा चित्रपट करेन असं मी ठरवलं होतं. मला चित्रपटाची कथा खूपच आवडली होती. ‘साथिया’चा दिग्दर्शक शाद अली माझा शाळकरी मित्र आहे. सुरुवातीला तो अभिषेकबरोबर चित्रपट बनवत होता परंतु, ते काही कारणास्तव शक्य झालं नाही.”विवेक पुढे म्हणाला, “शादने मला त्याच्या घरी बोलावलं होतं. त्यावेळी आम्ही मणिरत्नमचा ‘आलापयुथे’ हा मूळ चित्रपट पाहिला. याच चित्रपटावर ‘साथिया’ आधारित आहे. तो चित्रपट पाहताना मी शादबरोबर काम करायचं ठरवलं. रेल्वे स्टेशनला शूटिंग करताना मी तिथेच बेंचवर झोपायचो कारण, तेव्हा आमच्याकडे बजेट नव्हतं. मला कोणीही ओळखत नव्हतं. माझ्याकडे मेकअप/व्हॅनिटी व्हॅन नसल्याने मी रेस्टॉरंटच्या स्वच्छतागृहात कपडे बदलायचो. आम्हाला एका दिवसात चार सीन शूट करायचे होते. त्यामुळे दिवसाला १८ ते २० तास मी काम केलं.”“चित्रीकरण सुरू असताना आम्ही अनेकदा शूटिंगसाठी स्वतःचं सामान घेऊन जायचो.

## नवरा म्हणून माझ्यात काय कमी

बॉलीवूड अभिनेता आमिर खान मिस्टर परफेक्शनिस्ट म्हणूनही ओळखला जातो. आमिर अभिनयाबरोबर त्याच्या वैयक्तिक आयुष्यामुळेही अनेकदा चर्चेत असतो. साल २००५ मध्ये आमिरने किरण रावबरोबर लग्नगाठ बांधली. मात्र, लग्नाच्या काही वर्षातच २०२१ मध्ये दोघांनी घटस्फोट घेतला. आमिर व किरणच्या घटस्फोटाच्या निर्णयाने अनेकांना आश्चर्याचा धक्का बसला होता. आता लग्नाच्या तीन वर्षांनंतर आमिरने घटस्फोटाबाबत भाष्य केले आहे. नुकतेच आमिर एबीपीच्या आयडिया ऑफ इंडिया समिटमध्ये सहभागी झाला होता. या मुलाखतीत त्याने त्याच्या करिअरबरोबर वैयक्तिक आयुष्याबाबतही अनेक खुलासे केले. दरम्यान, आमिरने या मुलाखतीत त्याच्या व किरणच्या घटस्फोटाबातही भाष्य केले. आमिर म्हणाला, “तुम्हा सर्वांना माहीत असेलच की, आमचा नुकताच घटस्फोट झाला आहे. एक दिवस मी संध्याकाळी बसलो होतो, तेव्हा मी किरणला म्हणालो की, नवरा म्हणून माझ्यात काय कमी होती? मी स्वतःमध्ये काय सुधारणा करू शकतो? आता मी आयुष्यात पुढे जात आहे. तर यावर नक्कीच विचार करेन.

## रकुल-जॅकीचा जबरदस्त डान्स



अभिनेत्री रकुल प्रीत सिंग व अभिनेता जॅकी भगनानी यांनी २१ फेब्रुवारीला गोव्यात लग्नगाठ बांधली. गेल्या अनेक दिवसांपासून दोघांच्या लग्नाची चांगलीच चर्चा रंगली होती. अखेर दोघांनी लग्न करत नव्या आयुष्याला सुरुवात केली. दोघांच्या लग्नातील फोटो व व्हिडीओ सोशल मीडियावर चांगलेच व्हायरल झाले होते. यावेळी लग्नातील दोघांच्या लूकची चांगलीच चर्चा रंगली. आता दोघांच्या संगीत कार्यक्रमातील फोटो समोर आले आहेत.रकुलने आपल्या इन्स्टाग्रामवर संगीत कार्यक्रमातील काही फोटो शेअर केले आहेत. एका फोटोत दोघे एकमेकांचा हात पकडून कार्यक्रमस्थळी येताना दिसत आहेत. तर दुसऱ्या फोटोत दोघे डान्स करताना दिसत आहेत. फोटोवरुन रकुल व जॅकीने संगीत कार्यक्रमात धमाकेदार डान्स केला असल्याचे दिसून येत आहे. सोशल मीडियावर हे फोटो मोठ्या प्रमाणात व्हायरल झाले आहेत. अनेक चाहत्यांनी या फोटोवर कमेंट केल्या आहेत.रकुल प्रीतने तिच्या संगीत कार्यक्रमासाठी प्रसिद्ध फॅशन डिझायनर फाल्गुनी पिकॉकने डिझाईन केलेला लेहेंगा परिधान केला होता. संगीतामध्ये, रकुलने पीच रंगाचा लेहेंगा घातला होता, ज्यावर एम्ब्रॉयडरी केली होती. तर गळ्यात रकुलने हिऱ्यांचा हार घातला होता. तर जॅकीने संगीत कार्यक्रमासाठी वेलवेटपासून बनवलेला गडद निळ्या रंगाचा सूट परिधान केला होता. या लूकमध्ये दोघेही खूपच सुंदर दिसत होते.रकुल व जॅकीने पंजाबी आणि सिंधी रीतीरिवाजानुसार लग्नगाठ बांधली. रकुल पंजाबी आहे. त्यामुळे दोघांचा विवाह पहिल्यांदा ‘आनंद कारज’ (पंजाबी रीतीरिवाज)नुसार झाला. तर जॅकी हा सिंधी कुटुंबातील असल्यामुळे पंजाबी पद्धतीने लग्न केल्यानंतर त्यांनी सिंधी पद्धतीने पुन्हा एकदा लग्न केले. लग्नानंतर दोघांनी पाहुण्यांसाठी पार्टीही आयोजित केली होती.

## रितेश-जिनिलीयाचा जबरदस्त डान्स

जिनिलीया व रितेश देशमुखकडे बॉलीवूडची आदर्श जोडी म्हणून पाहिलं जातं. हे दोघेही सोशल मीडियावर प्रचंड सक्रिय असतात. गेल्या काही दिवसांपासून शूटिंगनिमित्त रितेश परदेशात होता. आता अभिनेता पुन्हा एकदा भारतात परतल्याने रितेश-जिनिलीयाची धमाल नव्याने सुरू झाल्याचं पाहायला मिळत आहे. सोशल मीडियावर विविध रील्स आणि डान्स व्हिडीओ शेअर करत त्यांच्या चाहत्यांचं मनोरंजन करत असतात. महाराष्ट्राचे लाडके ‘दादा वहिनी’ म्हणून या दोघांना ओळखलं जातं. नुकताच या दोघांनी आपल्या मित्रमंडळींसह भन्नाट डान्स केल्याचं पाहायला मिळत आहे.कतरिना कैफचं ‘चिकनी चमेली’ गाणं २०११ मध्ये प्रेक्षकांच्या भेटीला आलं होतं. या गाण्याची लोकप्रियता आजही कायम आहे. रितेश-जिनिलीया आपल्या मित्रमंडळींबरोबर याच ‘चिकनी चमेली’ गाण्यावर थिरकल्याचं पाहायला मिळत आहे. जेनिफर विंगेट, कांची कौल, आशिष चौधरी, शब्बीर अहलूवालिया, मुश्ताक शेख, समिता बांगर्गी हे सगळे कलाकार रितेश-जिनिलीयाबरोबर या व्हिडीओमध्ये जबरदस्त डान्स करत असल्याचं पाहायला मिळत आहे.रितेश-जिनिलीयाच्या या भन्नाट व्हिडीओवर चाहत्यांनी कौतुकाचा वर्षाव केला आहे. या डान्स व्हिडीओला अवघ्या तासाभरात तब्बल ३५ लाखांहून अधिक व्ह्यूज मिळाले आहे. याशिवाय नेटकऱ्यांनी कमेंट्सचा देखील पाऊस पाडला आहे. “वहिनी लय भारी”, तुम्ही मस्त एंजॉय करता”, “रितेश भाऊ कमाल”, “आम्हाला असे मित्र का नाहीत?”, “दहा वेळा तरी हा व्हिडीओ आम्ही पाहिलाय” अशा प्रतिक्रिया नेटकऱ्यांनी या व्हिडीओवर दिल्या आहेत.

## शाहरुख खानकडे आहेत तब्बल ‘एवढे’ फोन

बॉलीवूड किंग शाहरुख खान नेहमी चर्चेत असतो. अभिनयाच्या जोरावर शाहरुखने प्रेक्षकांच्या मनात वेगळे स्थान निर्माण केले आहे. सोशल मीडियावर शाहरुख मोठ्या प्रमाणात सक्रिय असतो. निरनिराळे फोटो व व्हिडीओ शेअर करीत तो चाहत्यांना अपडेट देत असतो. जगभरात शाहरुखचे लाखो चाहते आहेत. शाहरुखबद्दल प्रत्येक गोष्ट जाणून घेण्यास चाहते नेहमीच उत्सुक असतात.शाहरुखने टेलिव्हिजनवरून करिअरला सुरुवात केली. मालिकेपासून चित्रपटांपर्यंतचा शाहरुखचा प्रवास म्हणावा तेवढा सोपा नव्हता. शाहरुखच्या कठीण काळात त्याला मदत केली ती निर्माते विवेक वासवानी यांनी. वासवानी यांनी शाहरुखला चित्रपटात केवळ लॉंचच केले नाही, तर संघर्षमय काळात त्याला आपल्या घरी राहण्यास जागाही दिली होती. एकेकाळी विवेक व शाहरुख खास मित्र मानले जायचे. अनेक किस्से सांगितले आहेत.सिद्धार्थ कन्ननला दिलेल्या मुलाखतीत विवेक यांनी शाहरुखबाबत अनेक खुलासे केले आहेत. ते म्हणाले, “शाहरुख आणि मी एकमेकांशी बोलतही नाही आणि भेटतही नाही. पण जेव्हा कधी आम्ही एकमेकांना भेटतो, तेव्हा आम्हाला आम्ही कालच भेटलो होतो.



# रोहित शर्मा पंचांवर भडकला!

## सामना थांबवला फलंदाज पॅव्हेलियनच्या दिशेने निघाले

नवी दिल्ली । वृत्तसंस्था

**भारत आणि न्यूझीलंड यांच्यातील पहिल्या कसोटी सामन्यात पावसाने वेळोवेळी व्यत्यय आणला आहे. सततच्या पावसाने सामन्याची दिशा बदलण्यातही भूमिका बजावली आहे. बंगळुरूमधील पावसामुळेच पहिल्या दिवसाचा खेळ होऊ शकला नाही, इतकंच काय तर नाणेफेकही झाली नव्हती. आता सामन्याच्या चौथ्या दिवशीही पावसाने टीम इंडियाची परीक्षा घेतली . खेळाच्या चौथ्या दिवशी दोन वेळा पावसामुळे सामना थांबवला गेला. दरम्यान, चौथ्या दिवसाच्या शेवटी असं काही घडलं की ज्यामुळे टीम इंडियाचा कर्णधार रोहित शर्मासह भारतीय खेळाडू नाराज झाले. इतकंच नव्हे तर रोहित आणि विराट पंचांशी वाद घालतानाही दिसला.**



भारतीय संघाने दुसऱ्या डावात चांगली फलंदाजी ४६२ धावा केल्या. यासह भारताने न्यूझीलंड संघाला विजयासाठी १०७ धावांचे लक्ष्य दिले आहे. चौथ्या दिवसाचा खेळ संपेपर्यंत भारतीय संघ सर्वबाद झाला आणि न्यूझीलंडच्या डावालाही लगेच सुरूवात झाली. भारतीय संघ गोलंदाजीसाठी आला आणि रोहित शर्माने पहिल्याच षटकात जसप्रीत बुमराहकडे चेंडू सोपवला. जसप्रीत बुमराह जबरदस्त फॉर्ममध्ये दिसत होता. त्यामुळे चौथ्या दिवसाचा खेळ संपण्यापूर्वी टीम इंडियाला ब्रेकथ्रू मिळेल, अशी रोहित शर्मासह सर्वांचीच इच्छा होती. बुमराहही भेदक गोलंदाजी करत होता. पण विकेट पडण्याआधीच पंचांच्या इशाऱ्यामुळे किवी फलंदाज अचानक पॅव्हेलियनच्या दिशेने निघाले.सामन्याच्या चौथ्या डावातील पहिल्या षटकात जसप्रीत बुमराहने फक्त चार चेंडू टाकले होते. तितक्यात पंचांनी खराब प्रकाशामुळे सामना थांबवला. लाईट मीटरने प्रकाश तपासल्यानंतर पंचांनी सामना थांबवण्याचे जाहीर केले. यामुळे टीम इंडियाचा कर्णधार रोहित शर्मा चांगलाच संतापलेला दिसत होता. रोहित शर्माशिवाय टीम इंडियाचे इतर खेळाडूही नाराज दिसले. अजून प्रकाश आहे आणि सामना खेळवता येईल किंवा एक षटक तरी पूर्ण करावे, असं रोहित पंचांना सांगण्याचा प्रयत्न करत असल्याचे जाणवत होते.रोहित शर्मा पंचांना समजावत होता पण तोपर्यंत किवी फलंदाज कॉन्वे आणि लॅथम मैदानाबाहेर गेले होते. शेवटी भारतीय संघालाही माघारी जावे लागले आणि सामना थांबवण्यात आला. यामुळे टीम इंडिया खूपच संतप्त दिसत होती. रोहित शर्माच्या चेहऱ्यावर तर राग स्पष्ट दिसत होता आणि त्यानंतर रोहितबरोबर विराट कोहलीही पंचांशी बोलताना दिसला. पण याचा काही उपयोग झाला नाही. त्यानंतर काही वेळाने पावसानेही हजेरी लावली आणि मग चौथ्या दिवसाचा खेळ रद्द करण्यात आला. भारत आणि न्यूझीलंड याच्यातील कसोटी मालिकेतील पहिला सामना बंगळुरु येथे खेळला जात आहे. रोहित-कोहलीनंतर सर्फराझ खान आणि ऋषभ पंत यांनी शानदार फलंदाजी केली. ऋषभ पंतचे शतक अवघ्या एका धावेने हुकले आणि तो ९९ धावा करून बाद झाला. मात्र, सर्फराझला त्याच्या आंतरराष्ट्रीय कारकिर्दीतील पहिले शतक झळकावण्यात यश आले आणि त्याने १५० धावांची शानदार खेळी साकारली. सरफराजने बंगळुरु कसोटीत एक पराक्रम मोठा पराक्रम केला आहे, जो यापूर्वी १९९६ मध्ये भारतीय क्रिकेटच्या इतिहासात नोंदवला गेला होता.वास्तविक, पहिल्या डावात शून्यावर बाद झाल्यानंतर दुसऱ्या डावात १५० धावा करणारा सर्फराझ हा तिसरा भारतीय फलंदाज ठरला आहे. सर्फराझच्या आधी नयन मोंगियाने १९९६ मध्ये ऑस्ट्रेलियाविरुद्ध ही अनोखी कामगिरी केली होती. त्याच वेळी, १९५३ मध्ये माधव आपटेने वेस्ट इंडिजविरुद्ध पहिल्या डावात शून्यावर बाद झाल्यानंतर दुसऱ्या डावात १६३ धावांची नाबाद खेळी केली होती.फर्राझ-पंतच्या उत्कृष्ट भागीदारीमुळे न्यूझीलंडने घेतलेली ३५६ धावांची आघाडी दूर करण्यात टीम इंडियाला यश आले. आपल्याच मातीत खेळत भारतीय संघाने दुसऱ्या क्रमांकाची सर्वोच्च धावसंख्या करत विरोधी संघाने घेतलेली आघाडी मोडून काढली. १९८५ मध्ये इंग्लंडने पहिल्या डावात ३८० धावांची आघाडी घेतली होती, जी भारताच्या फलंदाजांना संपवण्यात यश आले होते.

### पंतनेही खूप फटकेबाजी केली

ऋषभ पंतनेही खूप फटकेबाजी केली आणि १०५ चेंडूत ९९ धावांची दमदार खेळी साकारली. पंतने आपल्या खेळीत ९ चौकार आणि ५ षटकार मारले. याआधी विराट कोहलीनेही चांगली फलंदाजी करत ७० धावांची महत्त्वपूर्ण खेळी केली, तर कर्णधार रोहित शर्माने ५२ धावांचे योगदान दिले. त्यामुळे भारतीय संघाला दुसऱ्या डावात ४६२ धावा करता आल्या. न्यूझीलंडसाठी विल्यम ओ रुक आणि मॅट हेन्री यांनी प्रत्येकी तीन गडी बाद केले. त्याचबरोबर एजाज पटेलने दोन विकेट्स घेतल्या. तसेच साऊदी आणि फिलिप्सने प्रत्येकी एक विकेट घेतली.

---

# सर्फराझने साऊदीविरुद्ध चौकार मारून पूर्ण केले शतक

## सूरज समय पर निकलेगा', सर्फराझच्या वडिलांचे शब्द ठरले खरे

। नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**सरफराज खानने भारतासाठी पदार्पण केले होते, तेव्हा त्याचे वडील नौशाद खान यांनी कॉमेंट्री बॉक्समध्ये म्हणाले होते की, 'रात को वक्त दो गुजारने के लिए, सूरज अपने ही समय पर ही निकलेगा'. आता त्यांच्या मुलाने त्यांची मान अभिमानाने उंचावली आहे. सर्फराझ खानने शनिवारी बंगळुरू येथे सुरू असलेल्या न्यूझीलंडविरुद्धच्या कसोटीच्या दुसऱ्या डावात शतक झळकावून भारतीय संघाचा डाव सावरला.**






आता त्याच्या या शतकावर ऑस्ट्रेलियाचा स्फोटक फलंदाज डेव्हिड वार्नरने प्रतिक्रिया दिली आहे.डेव्हिड वॉर्नरने २६ वर्षीय सर्फराझच्या शतकी खेळीचे आणि मेहनतीचे कौतुक केले. त्याचबरोबर इन्स्टाग्रामवर स्टोरी शेअर केली आहे, ज्यामध्ये त्याने लिहिले,"शाबास सर्फराझन. तुझ्या एवढ्या मेहनतीनंतर हे शतक पाहून आनंदा झाला."सरफराजच्या फोटोंच्या कोलाजवर हिंदीत लिहिले आहे की, 'रात को वक्त दो गुजारने के लिए, सूरज अपने ही समय पर निकलेगा'.देशांतर्गत क्रिकेटमध्ये सातत्याने धावा केल्यानंतर सर्फराझ खानला अखेर फेब्रुवारी २०२४ मध्ये भारतासाठी कसोटी पदार्पण करण्याची संधी मिळाली. कर्णधार रोहित शर्माने त्याला कॅप दिली तेव्हा सर्फराझचे वडील भावूक झाले होते. त्यानंतर सर्फराझ फलंदाजीसाठी आला, तेव्हा त्याच्या वडिलांना कॉमेंट्री बॉक्समध्ये बोलावण्यात आले. हिंदी समालोचक आकाश चोप्राने विचारले की, तुमच्या मुलाला इतक्या उशिरा पदार्पण करण्याची संधी मिळाली हे कसे वाटते? सर्फराझ खानच्या वडिलांनी उत्तर दिले, 'रात को वक्त दो गुजारने के लिए, सूरज अपने ही समय पर निकलेगा'.

### रोहित शर्माने 52 धावांचे योगदान दिले

आज त्यांच्या मुलाने शतक झळकावून त्यांचे शब्द खरे केले.२६ वर्षीय सर्फराझने शुक्रवारी विराट कोहली (१०२ चेंडूत ७०) सोबत तिसऱ्या विकेटसाठी १३६ धावांची भागीदारी केली. तिसऱ्या दिवसाच्या शेवटच्या चेंडूवर कोहली बाद झाल्यानंतर ही भागीदारी मोडली. सर्फराझने चौथ्या दिवशी ७० धावांवरुन डावाला सुरुवात केली आणि वेगवान धावा करत शतक झळकावले. त्याने ९०.९ च्या स्ट्राइक रेटने पहिले कसोटी शतक झळकावले.